# दूधी भोपळा रस प्रयोगाने बायपास शस्त्रक्रिया तर रद्द केलीच; व ११ किलो वजनही कमी केले

सन २००४ साली ऑगस्ट-सप्टेंबर महिन्याच्या सुमारास रस्त्यानी चालताना मला अचानक जोरजोरात धाप लागू लागली. म्हणून मी माझ्या फॅमिली डॉक्टरांकडे गेलो. मला माझ्या फॅमिली डॉक्टरांनी हृदय तपासणी करण्यास सांगितली. माझी सर्वप्रथम दिनदयाळ नर्सिंग होममध्ये स्ट्रेस, इको आणि रूबी हॉलमध्ये थॅलियम टेस्ट झाली. ह्या टेस्ट झाल्यावर मला डॉक्टरांनी हृदयाची एन्जिओग्राफी करण्यास सांगितली. डॉ. हरदास यांनी २४ ऑक्टोबर २००४ साली एन्जिओग्राफीची चाचणी केली व मला हृदयाच्या दोन वाहिन्या ९०% अवरोधीत (चोकप) झाल्याचे सांगितले आणि मला त्वरीत दोन महिन्यांच्या आत बायपास किंवा एन्जिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिला. ह्या सर्व शस्त्रक्रियांचा साधारण खर्च २ ते अडीच लाख रुपये होता आणि हा खर्च ऐकून माझ्या मनावर अतिशय ताण आला. आणि अशा परिस्थितीत मी काय करावे व काय निर्णय घ्यावा याचाही अंदाज मला लागत नव्हता. या वेळी मी खुपच घाबरून व भांबावून गेलो होतो. एवढा खर्च करणं मला माझ्या आर्थिक परिस्थितीमुळे अशक्य होतं. या अशा संकटाच्या वेळी मला आमच्या कंपनीतील मित्र आणि योगशिक्षक श्री. निफाडकर मला देवासारखे भेटले आणि त्यांनी मला बायपास टाळण्यासाठी खुप चांगला सल्ला दिला आणि मार्गदर्शन केले. त्यांनी मला नाशिक रोडवरील योग विद्याधाम यांच्या निसर्ग उपचार केंद्रामध्ये दाखल केले. तिथे मला योगाचार्य श्री. मंडलिक सर यांचे बहुमोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनी मला संपूर्ण जीवनशैली बदलण्याचा सल्ला दिला. आणि

**2004**



श्री. प्रमोद भास्कर सुभेदार
रस घेण्याआधी २००४

**2005**



श्री. प्रमोद भास्कर सुभेदार
रस घेतल्यानंतरचा २००५

**एकूण ११ किलो वजन कमी**
**व बायपास रद्द**

त्यांनी मला 'तुम्ही जीवनशैली बदलली तरच तुमची या रोगातून सुटका होईल असे सांगितले.' नाशिकमधील योग विद्याधाम येथे त्यांनी मला १० दिवस मार्गदर्शन केले. त्या मार्गदर्शनात माझ्या रोजच्या आहारावरील नियंत्रण काही योग अभ्यास आणि काही आयुर्वेदिक औषधे आणि त्याचबरोबर दूधी भोपळ्याचा रस घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी वर्षभर माझी दीनचर्या सुरू केली व पुन्हा कामावर राजी झालो. मी कामाला गेल्यावर माझ्या बऱ्याच मित्रांनी माझी चौकशी केली. त्यात माझे हृदयमित्र संस्थेचे सदस्य श्री. रत्नाकर बडवे यांनी मला हृदयमित्र या संस्थेबद्दल माहिती दिली व दूधी भोपळ्याचा रस एकदा न घेता तीनदा घेण्याची विनंती केली व आज २३ ऑक्टोबरला मला एक वर्ष होत आहे. आणि मी वर्षभर दूधी भोपळ्याचा रस घेत आहे. त्यामुळे माझे वजन वर्षभरात ११ किलोनी आटोक्यात येऊन माझ्या उल्हासात भर पडली. माझा मधुमेह पूर्णपणे आटोक्यात आला. बी.पी. नॉर्मल झाले. अंगात नवचैतन्य निर्माण होऊन मी माझी पूर्वीची कामेसुद्धा करू लागलो आहे. आज माझे वय ५३ असून सुद्धा मला नवचैतन्य आल्यासारखे वाटत आहे. आणि बजाज ॲटोसारख्या कंपनीत सुद्धा तरुण रक्ताबरोबरच जोमाने काम करत आहे. ''माझ्यासारख्या हृदयविकारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांनी दूधी भोपळ्याचा रसप्रयोग आणि विशिष्ट जीवनशैली या योगाने निरोगी जीवन जगावे म्हणूनच हा खटाटोप.''

**श्री. प्रमोद भास्कर सुभेदार**
५०/८, यमुनानगर, निगडी, पुणे-४४.



श्री. राघवेंद्र पाटील

# दूधी भोपळा रस प्रयोगाने ठरलेली बायपास रद्द व इन्शुलीन बंद

**श्री. राघवेंद्र पाटील :** (वय ४८) रा. आंतरीक्ष सोसायटी, पिंपरी. यांच्या दुबईतील भावाने क्रेडीट कार्डने १,२०,००० रु. शस्त्रक्रियेला एन. एम. वाडिया मध्ये भरले व तो दुबईला निघून गेला. राघवेंद्र पाटील यांची बायपास शस्त्रक्रिया ३ मे २००५ रोजी ठरली होती. डॉक्टरांनी त्यांना चौथ्या मजल्यावरून शस्त्रक्रिया होईपर्यंत खाली उतरू नये असे सांगितले होते. मधुमेह नियंत्रित करण्याकरिता ते इन्सुलिन घेत होते. अचानक वर्तमानपत्रातून त्यांनी दुधी भोपळा रसप्रयोग बद्दल वाचून मला फोन केला व फोनवर माहिती देण्यास सांगितले. मी त्यांना फोनवर माहिती देण्याची असमर्थता दाखविली व प्रत्यक्ष व्याख्यानाला या असे सांगितले. राघवेंद्र पाटील म्हणाले, की डॉक्टरनी मनाई केल्यामुळे मी येऊ शकत नाही. मी म्हणालो, तुम्ही चार जिने उतरू शकत नाही तर तुम्ही शस्त्रक्रिया टाळू शकत नाही. या वाक्याचा काय परिणाम झाला व रुग्ण भर पावसात पिंपरीहून रिक्षा करून आला व त्याने व्याख्यान ऐकले. जाताना तो म्हणाला मी बायपास रद्द करणार. मी माझा विसरून गेलो. चार महिन्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघ, मासुळकर कॉलनी, पिंपरी येथील माझ्या व्याख्यानास राघवेंद पाटील मला भेटले व बायपास रद्द केल्याचे सांगितले. मी पहिला रुग्ण आहे ज्याने एन. एम. वाडिया हॉस्पिटल मध्ये भरलेले १,२०,००० रु. परत आणले आहेत. आता राघवेंद्र पाटील स्वस्थ आहेत. रोज ८० किलोमीटर व्यवसायानिमित्त गाडीवरून फिरतात व काही अडचण येत नाही. त्यांनी इन्शुलिन घेण्याचे बंद केले असून ते पूर्ण स्वस्थ आहेत.